**कै.किसनराव धनवे माध्यमिक विद्यालय भार्डी ता.अंबड जि.जालना**

**# उद्देश मानके आणि ध्येय. #**

- कै.किसनराव धनवे माध्यमिक विद्यालयाची स्थापना ज्ञानदानासारखे पवित्र कार्य करण्यासाठी केलेली आहे.
- शालेय मुलामुलींच्या शिक्षणाची गैरसोय होऊ नये किंवा ज्ञानापासून हि पिढी वंचित राहू नये म्हणून सदर गावासोबत जोडलेली नाळ कायम ठेवण्यासाठी या गावामध्ये कै.किसनराव धनवे माध्यमिक विद्यालय सुरु केले आहे.
- सदर विद्यालयाचा मूळ उद्देश व हेतू ज्ञानदान आणि पिढी घडविणे हा एकमेव आहे.
- चांगल्या आरोग्यासाठी ऑक्सिजन,मानसिक संतुलनासाठी निसर्गाची साथ आणि आत्मिक बळासाठी नैसर्गिक वातावरणाची गरज असल्यामुळे विद्यालयाचा संपूर्ण परिसर हा हिरवाईने नटलेला आहे.
- सध्याच्या काळातील समाजामध्ये गतीने अनेक बदल होत आहे, याबदलांसोबत सदर विद्यालयामध्ये कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून विद्यालयामध्ये सी.सी.टी.वी. कॅमेरे कार्यान्वित आहेत.
- विद्यालयातील प्रत्येक पाल्य हि आमची जबाबदारी असल्यामुळे आपत्कालीन व्यवस्थापनाच्या दृष्टीने अग्निशमन यंत्रणा शालेय इमारतीमध्ये उपलब्ध आहे,तसेच शालेय इमारत हि सुटसुटीत आणि मोकळी आहे.
- ज्ञानासाठी गुरूंची महत्वाची भूमिका आहे आणि म्हणून सदर विद्यालयामध्ये प्रशिक्षित उच्चशिक्षित शिक्षकवर्ग आहे.

- ❖ शालेय विद्यार्थांच्या सर्वांगीण हिताच्या दृष्टीने म्हणजेच सामाजिक,आर्थिक,नैतिक,आत्मिक विकासाच्या दृष्टीने तसेच सुदृढ जडण-घडणाच्या दृष्टीने सर्व सुविधायुक्त अशी सुसज्ज प्रयोगशाळा, ग्रंथालय,नियमित परिपाठ,संगणक कक्ष,प्रोजेक्टर कक्ष अद्यावत विद्यालयामध्ये उपलब्ध आहे.
- ❖ जागतिक,तसेच राष्ट्रीय स्तरावर खेळाडू तयार होण्याच्या दृष्टीने प्रशस्त असे खेळाचे मैदान उपलब्ध आहे.
- ❖ शालेय मुलामुलीकरिता व शिक्षकांसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहाची व्यवस्था केलेली आहे. सदर स्वच्छता गृहामध्ये आवश्यक असलेल्या सर्व सुविधा उपलब्ध आहे.
- ❖ शासन मान्यता प्राप्त शालेय पोषण आहार नियमित दिला जातो,सदर शालेय पोषण आहारासाठी शासनाच्या अनुदानाची वाट न पाहता किंवा त्यावर अवलंबून न राहता शिक्षक स्वतः आपले पाल्य समजून ही व्यवस्था करतात.
- ❖ शालेय पोषण आहारासाठी स्वयंपाकी आणि मदतनीस यांची नेमणूक केलेली आहे आणि त्यांचे मानधन शासनाच्या DBT योजनेद्वारे होते.
- ❖ गुणवत्ता शिष्यवृती, सुवर्णमहोत्सवी शिष्यवृती, सावित्रीबाई फुले शिष्यवृती, ८ वी ते १० वी मागासवर्गीय शिष्यवृती, (NMMS) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृती. या सर्व योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना शासनामार्फत DBT योजनेद्वारे दिला जातो.
- ❖ आमच्या विद्यालयामध्ये मुलांना विज्ञानाची गोडी निर्माण होण्यासाठी तसेच त्यांच्यामध्ये असलेल्या संशोधक वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी विज्ञान प्रदर्शन, Inspire Award मध्ये मुलांचा सहभाग घेतला जातो.

- सर्व प्रकारचे शालेय कामकाज सुरळीत चालण्यासाठी विद्यालयात शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना केलेली आहे. सदर समितीच्या वेळोवेळी नियमित बैठका घेतल्या जातात.
- सदर विद्यालयामध्ये शिक्षक-पालक संघाची स्थापना केलेली आहे. सदर समितीच्या वेळोवेळी नियमित बैठका घेतल्या जातात.
- विद्यालयामध्ये नियमित पालक सभा आयोजित केली जाते व पालकांचे प्रश्न विचारात घेऊन त्यांचे निरसन केले जाते.
- विद्यालयामध्ये महिला शिक्षिका आहे आणि शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थिनी शाळेत येतात. सदर महिला शिक्षिका व मुलीना संरक्षण, आत्मविश्वास आणि आरोग्यदायी, आनंददायी वातावरण देणे हे विद्यालयाचे उद्दिष्ट आहे आणि म्हणून विद्यालयामध्ये महिला तक्रार निवारण समितीची ( विशाखा समिती ) स्थापना केलेली आहे.
- विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने त्यांचे विविध प्रकारचे खेळ घेतले जातात व त्यासाठी तज्ञ प्रशिक्षकाची नेमणूक केलेली आहे.
- योग ज्यामुळे आरोग्य तसेच वैचारिक शक्तीस चालना मिळते, त्यामुळे योग शिबिराचे नियमित आयोजन केले जाते.
- नियमितपणे विद्यार्थांचे आरोग्य शिबीर आयोजित केले जाते.
- शासनामार्फत विविध शासकीय योजना राबविल्या जातात ज्या शालेय विद्यार्थांशी संबधित असतात त्यांची माहिती त्यांना देण्यात येते.
- विद्यालयामध्ये वर्षभरामध्ये विविध शेत्रातील नामांकित आणि तज्ञ व्यक्तींना आमंत्रित करून त्यांचे अनुभव आणि व्याखानाचे आयोजन केले जातात.

- ❖ विद्यालयाचा २००४ ते २०२३ पर्यंतचा निकाल हा सरासरी ९० टक्क्याहून अधिक आहे.  सदर विद्यालयाचा निकाल हा प्रतिवर्षी १०० टक्के पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट विद्यालयाने ठेवलेले आहे.
- ❖ सदर विद्यालयामध्ये शासनाच्या आलेल्या निधीचा वापर किंवा अनुदान हे सर्व काही संगणक प्रणालीमार्फत शासनाच्या वेबसाईटवर आलेले आहे.
- ❖ पारदर्शक आणि कायद्याला बांधील आमच्या विद्यालयाची संपूर्ण माहिती संगणक प्रणाली मार्फत नेटवर्कला जोडलेली आहे.
- ❖ माध्यमिक शाळा संहिता प्रमाणे व वेळोवेळी शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी,शिक्षण विस्तार अधिकारी , केंद्रप्रमुख यांच्याकडून मिळालेल्या सुचनेप्रमाणे / नियमाप्रमाणे विद्यालय चालवले जाते.